# प्रकरण पाचवे

# सारांश निष्कर्ष व शिफारस

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIB
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## सारांश निष्कर्ष व शिफारस

भारतीय लोकशाही व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग हा भारताने राज्यघटना स्विकारल्यापासुन काही अंशी दिसून येतो. लिखित राज्यघटनेच्या माध्यमातून लोकशाही व्यवस्थेतील समाज जीवनाला सामावून घेण्याचा प्रयत्न भारतात दिसून येतो. या प्रयत्नात भारतीय समाजातील महिलांचा ही विचार केलेला दिसून येतो. महिलांचा राजकीय विकास हा भारतामध्ये १९९२ पर्यंत संकुचित असा होता. १९९२ नंतर ग्रामीण आणि शहरी महिलांमध्ये राजकीय जागृती निर्माण झाली.

भारतामध्ये १९९२ नंतर ७३ व ७४ वी घटना दुरूस्ती झाली. त्या दुरूस्तीनंतर स्थानिक व शहरी स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढू लागला. महिलांना पंचायत राज्य व्यवस्थेमध्ये सुरूवातीला ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. नंतर या आरक्षणात वाढ करून ती ५० टक्के करण्यात आली. ५० टक्के आरक्षणामुळे महिलांचा सहभाग अधिक सक्रियपणे राजकारणात वाढला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर नागरी स्वराज्य संस्थेच्या कारभाराविषयी वेगवेगळया पध्दतीने उपाय्योजना करण्यात आल्या. याच नागरी स्वराज्य संस्थेमध्ये ७४ व्या घटना दुरूस्तीनंतर अनेक बदल घडून आले. ज्याचा प्रभाव नागरी स्वराज्य संस्थेच्या कारभारावरती पडला. त्यातीलच एक महत्वपूर्ण बदल म्हणजे महिलांचे राजकारणातील नेतृत्व होय. तसेच महिलांचा राजकारणातील सहभाग त्यांचा प्रभाव होय. हा संदर्भ लक्षात घेवूनच इचलकरंजी नगरपरिषदेतील महिलांचा राजकीय सहभाग व प्रभाव २००१ ते २०१० या विषयाच्या अनुषंघाने प्रस्तुत संशोधनात्मक अभ्यास केला असता पुढील प्रमाणे निष्कर्ष दिसून येतात.

**निष्कर्ष:—**

१. इचलकरंजी नगरपरिषदच्या निवडणूकीमध्ये महिलांचा सहभाग २००१ च्या निवडणूकीमध्ये एकूण ५७ नगरसेवकापैकी २२ इतका होता तर २००६ च्या निवडणूकीमध्ये २१ इतका होता. निवडणूकीत महिलांचा सहभाग हा पुरूषांच्या

सहभागांच्या जवळपास असलेला दिसतो. यातुन महिला सक्षमीकरण झाल्याचे दिसते. (सारणी क्र. ३.३,३.८)

२. इचलकरंजी नगरपरिषदेच्या प्रभागहीन महिला नगरसेवकांचे निवडीचे प्रमाण पाहिले असता २००१ च्या निवडणूकीतील १९ प्रभागापैकी १४ प्रभागामध्ये महिला नगरसेवकांचे अस्तित्व दिसून येते तर २००६ च्या निवडणूकीमध्ये ५७ वॉर्ड पैकी २१ वॉर्डमध्ये महिला नगरसेवकांचे अस्तित्व दिसते. (सारणी क्र. ३.४, ३.९)

३. इचलकरंजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये महिला नगरसेवकांचे २००१ च्या निवडणूकीमध्ये पक्षहीन वर्गीकरण पाहिले असता भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाने सर्वात जास्त म्हणजे ११ महिला नगरसेवकांना संधी दिल्याचे दिसते. तर भाजप या पक्षाने एकच महिला नगरसेवकाला संधी दिल्याचे दिसते. २००६ च्या निवडणूकीमध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचाच महिला नगरसेवकांना संधी देण्याचे प्रमाण जास्त दिसून येते ते १६ इतके आहे. इचलकरंजी नगरपालिकेतील राजकीय पक्षामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष हा महिला नगरसेवकांना जास्त प्रमाणात संधी देत असल्याचे दिसते. (सारणी क्र. ३.५, ३.१०)

४. इचलकरजी नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये महिला नगरसेवकांचे जातीहीन वर्गीकरण पाहिले असता २००१ व २००६ च्या निवडणूकीत मराठा जातीचे प्राबल्य दिसून येते.जैन समाजाचा एकच महिला नगरसेवक असल्याचे दिसते. लिंगायत माळी, देवांग कोष्टी, धनगर, महार, कारवान, न्हावी या जातींना कमीअधिक प्रमाणाात प्रतिनिधीत्व दिसून येते. अनुसुचित जमातीची लोकसंख्या येथे जास्त नसल्याने यांचा प्रभाव काहीच दिसत नाही. (सारणी क्र. ३.६, ३.११)

५. इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ व २००६ च्या निवडणूकीत महिला नगरसेवकांच्या निवडीमध्ये हिंदू आणि मुस्लिम यांचे प्रमाण पाहिले असता २००१ मधील २२ निवडून आलेल्या महिलामध्ये ३ मुस्लिम महिला नगरसेवक होत्या. तर २००६ च्या २१ महिला नगरसेवकांपैकी २ मुस्लिम महिला नगरसेवक होत्या. (सारणी क्र. ३.७, ३.१२)

६. इचलकरंजी नगरपरिषदेच्या २००१ व २००६ च्या निवडणूकीत महिला नगरसेवकांचे सक्रिय सहभाग दिसून येतो.

७. इचलकरंजी नगरपरिषदेच्या वार्षिक बैठकीमध्ये दोनपेक्षा अधिकवेळा बैठकीस उपस्थित राहणा—या महिला नगरसेकांचे प्रमाण ७२ टक्के असल्याचे दिसने. दोन तृतींअंश महिला नगरसेवक नगरपरिषदेच्या बैठकीबाबत जागरूक असून त्या सभागृहाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग घेताना दिसून येतात. (सारणी क्र. ४.१)

८. महिला नगरसेवक नगरपरिषदेच्या बैठकीविषयी जबाबदारीने वागतात. ९३ टक्के महिलांना बैठकीविषयी सुचना, माहिती असल्याचे दिसून येते. (सारणी क्र. ४.२)

९. नगरपरिषदेच्या वॉर्डच्या विकासासंबंधी ९५ टक्के महिला नगरसेवक आग्रही असल्याचे दिसतात. नगरपालिकेच्या बैठकीमध्ये वार्ड विकासाच्या मागणीसंबंधी जागरूकता असल्याचे दिसते. (सारणी क्र. ४.३)

१०. नगरपरिषदेच्या कामकाजामध्ये अंदाजपत्रकाची प्रक्रिया ही महत्वपूर्ण असून या अंदाजपत्रकाच्या माध्यमातूनच नगरपरिषदेची कामे पूर्ण होतात. ६९.७६ टक्के महिला नगरसेवक या अंदाजपत्रकाच्या प्रक्रियेत सहभाग घेतात. परंतू ३०.२४ टक्के महिलांचा सहभाग यात दिसून येत नाही. या प्रक्रियेत महिला नगरसेवकांचा १०० टक्के सहभाग असणे आवश्यक आहे पण इचलकरंजी नगरपरिषदेच्या अंदाजपत्रक प्रक्रियेत याचा अभाव दिसून येतो. (सारणी क्र. ४.४)

११. इचलकरंजी नगरपरिषदेच्या अंदाजपत्रकाशिवाय इतर विषयांच्या चर्चेमध्ये महिला नगरसेवकांचा ८६.०४ टक्के सहभाग दिसून येतो. हा सहभाग तसा लक्षणीय आहे. याच्या माध्यमातून नगरपरिषदेच्या विकासासाठी जे काही निर्णय घेतले जातात. त्यामध्ये महिला नगरसेवक आपले मत मांडून प्रभाव पाडतात. (सारणी क्र. ४.५)

१२. इचलकरंजी नगरपरिषदेच्या महिला नगरसेवकांच्या निर्णयप्रक्रियेत पुरूष नगरसेवकांचे सहकार्य हे ९३.०३ टक्के दिसून येते. पुरूष नगरसेवकांच्या या

सहकार्याने अनुभवी नसलेल्या महिला नगरसेवकांनाही निर्णय प्रक्रियेत सहभाग होण्यास प्रोत्साहान मिळते. (सारणी क्र. ४.६)

१३. इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांचे कौटुंबिक सहकार्यामध्ये ६९.७६ टक्के महिला नगरसेवकांनाच सहकार्य दिसून येते. पण सहकार्यामध्ये पतीचा व मुलाचा हस्तक्षेप दिसून येतो. अजुनही राजकारणामध्ये स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत नाही. त्यामध्ये मुख्य समस्या म्हणजे कौटुंबिक आहे. ज्यात महिला नगरसेवक असली तरी तिच्या पदावर तिचा पती हा प्रभाव पाडत असतो. त्यामुळे ती सक्षमपणे आपले मत मांडू शकत नाही. (सारणी क्र. ४.७)

१४. इचलकरंजी नगरपरिषदेच्या राजकीय पक्षांच्या निर्णय प्रक्रियेत महिला सहभाग हा ५० टक्केपेक्षा जास्त असल्याचा दिसतो. यामुळे महिला नेतृत्वाची निर्मिती होण्यास योग्य वातावरण तयार होते. (सारणी क्र. ४.८)

१५. नगरपरिषदेच्या दैनंदिन कामकाज प्रक्रियेमध्ये कर्मचारींशी महिलांचे संबंध, त्यांना आपल्या निर्णय प्रक्रियेच्या अंमलबजावणीसंबंधी विचार केला असता पुरूष नगरसेवक व कुटुंबातील सदस्य यांचा हस्तक्षेप अधिक दिसून येतो. यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्याचबरोबर राजकीय पक्षाचा प्रभाव हाही त्यांच्या निर्णय प्रक्रियेला अडथळा आणणारा एक घटक आहे. यामुळे त्यांना आपल्या विकासाच्या कल्पना राबवताना असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. (सारणी क्र. ४.९)

१६. नगरपरिषदेच्या विकासाच्याविषयी महिला नगरसेवकांचे मुलभूत समस्याकडे अधिक लक्ष दिसून येते ज्यामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सार्वजिक स्वच्छता या समस्येबद्दल महिला नगरसेवक जागरूक असून त्या सोडवण्यासाठी त्या प्राधान्यक्रमाने विचार करताना दिसतात. (सारणी क्र. ४.१०, ४.११)

१७. इचलकरंजी नगरपरिषदेच्या महिला नगरसेवकांना आपल्या प्रभागातील विविध समस्यांची माहिती ही जनतेकडून व वृत्तपत्र माध्यमातून ही मोठया प्रमाणात मिळते



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तसेच त्या प्रत्यक्ष पाहणी करताना दिसून येतात. परंतू नगरपालिकेचे जनसंपर्क कार्यालय फारच निष्क्रीय असल्याचे दिसून येते. (सारणी क्र. ४.१२)

१८. महिला नगरसेवक या शहराच्या स्वच्छतेसाठी नेहमी तत्पर असून शहरातील स्वच्छता ही नगरपरिषदेतील कामगाराकडून करून घेण्यात आग्रही आहेत तसेच वेगवेगळया माध्यमातून व वैयक्तिक गटांतून स्वच्छता मोहिम चालवल्या जाताना दिसून येतात. (सारणी क्र. ४.१३, ४.१४)

१९. इचलकरंजी नगरपरिषदेच्या नागरी सेवेविषयी महिला नगरसेवकांना निधीची कमतरता ही एक मुख्य समस्या वाटते. अपु—या निधीमुळे प्रशासनातील अनेक कामे रखडलेली दिसून येतात. (सारणी क्र. ४.१५, ४.१६)

२०. इचलकरंजी नगरपरिक्षेत्र औद्योगिक वसाहात असून इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला नगरसेवकांनी येथील टेक्सटाईल उद्योगांमध्ये महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी महिला क्रांती योजना सुरू केली आहे ज्याचा फायदा अनेक महिलांना रोजगार मिळवूण देण्यासाठी झालेला आहे. (सारणी क्र. ४.१७)

२१. इचलकरंजी नगरपरिषदेतील महिला बालकल्याण समितीवर महिला नगरसेवकांचे पूर्ण वर्चस्व दिसून येते यातून ते विविध प्रशिक्षण योजना चालवताना दिसतात. तसेच नगरपरिषदेतील प्रशासनासंबंधी महिला नगरसेवकांचा सकारात्मक दृष्टिकोन असलेला दिसून येतो. (सारणी क्र. ४.१८, ४.१९)

२२. इंचलकरंजी नगरपरिषदेमध्ये २००१ ते २०१० या कालावधीत दोन महिला नगरअध्यक्षा लाभल्या आहेत. या दोन्ही महिला नगरअध्यक्षांनी आपापल्या कार्यर्कीदीत मोठया प्रमाणात काम केले आहे. सौ. किशोरी आवाडे या ज्यावेळी नगरअध्यक्षा बनल्या तेव्हा त्या पक्षाच्यावतीने नगरअध्यक्षा म्हणून आरूढ झाल्या. तर सौ. मेघा चाळके या अपक्ष निवडून येवून नगरअध्यक्षा बनल्या. या दोन्ही नगरअध्यक्षांच्या कारर्कीदीत महिलांच्या स्वावलंबनासाठी प्रयत्न झालेले दिसून येतात. यांच्यातील भिन्नता पक्षीय राजकारणापुरते दिसून येत असले तरी महिला विकासाबाबत दोन्ही नगरअध्यक्षांनी आपल्या कृतीतून महिलांचा विकास त्यांच्यात स्वावलंबन याबाबतचेच कार्य केलेले दिसते.

**शिफारशी:—**

१. नागरी स्वराज्य संस्थेमधील निवडून येणा—या महिला नगरसेवकांना नगरपरिषदेतील संपूर्ण संस्थात्मक रचनेची जाणीव करून देण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा असावी. या कार्यशाळेचे नियोजन शासनाने करावे.

२. नागरी स्वराज्य संस्थेसंबंधी झालेली ७४ वी घटना दुरूस्तीबद्दल नागरी क्षेत्रामध्ये प्रसार व प्रचार करण्यासाठी शासनाने वेगवेगळे उपक्रम राबवावेत.

३. महिलांना ५० टक्के आरक्षण नागरी संस्थेमध्ये देवून न थांबता त्या आरक्षणाचा लाभ महिलांना मिळण्यासाठी व आरक्षणासंबंधी माहिती त्यांना होण्यासाठी जागृती निर्माण करावी.

४. राजकीय पक्षांच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग अधिक वाढवावा. ज्यामधून महिला नेतृत्वाची निर्मिती होवू शकेल.

५. महिलांमध्ये राजकीय जागृती करण्यासाठी राजकीय पक्षांनी प्रबोधनपर शिबीरे, चर्चासत्रे व कार्यशाळा यांचे आयोजन केले जावे.

६. महिलांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी गुन्हेगारी, हिंसाचार, दबाव, या समस्यांना पायबंद घालण्याविषयी कायदेशीर व दंडात्मक उपाययोजना करावी.

७. महिला सदस्यांना शहराच्या विकासासंबंधी योजना राबविताना त्यासंबंधी वेगळा पर्यायीनिधी निर्माण केला पाहिजे.

८. महिला नगरसेवकांच्या कामकाजामध्ये त्यांच्या पतीचा व कुटुंबांचा हस्तक्षेप थांबविणे गरजेचे आहे व त्यादृष्टिने जास्त प्रमाणात प्रयत्न केले पाहिजेत.

९. महिला नगरसेवकांना आपल्या प्रभागात समस्या सोडविण्यासाठी वेगळया निधीची तरतूद केलेली असावी.

१०. नगरपरिषदेच्या निवडून आलेल्या महिला नगरसेवकांची प्रत्येक महिन्याला एक बैठक आयोजित करावी ज्यामध्ये शहरातील महिलांच्या समस्या व प्रश्नावरती चर्चा करून त्यासंबंधी अधिकार द्यावेत.

११. नगरपरिषदेतील सर्वच नगरसेवकांनी महिला नगरसेवकांना मार्गदर्शन व सहकार्य केले पाहिजे.